

# शाळांमधील व्हॉलीबॉल

श्री. गणेश गावडे

सन २०२० च्या मे महिन्याच्या लॉकडाऊनमध्ये माझे मित्र प्रा डॉ. शरद आहेर यांचा फोन आला. गप्पांच्या दरम्यान शाळांमधील व्हॉलीबॉल यावर लेख लिहिण्याविषयी चर्चा झाली आणि झर्रर्कन डोळ्यासमोरून १९९०च्या दशकात डेक्कन जिमखान्यावर चालणाऱ्या शालेय स्पर्धा ते आता चंद्रशेखर आगाशे महाविद्यालयावर चालणाऱ्या आंतरशालेय स्पर्धा असा २५ वर्षाचा कालखंड सरकून गेला.

१९९० च्या दशकात डेक्कन जिमखान्यावर होणाऱ्या आंतरशालेय व्हॉलीबॉल स्पर्धांसाठी अनेक शाळांचे संघ अगदी सकाळी ८.०० वाजल्यापासून दाखल होत. मैदानावर आल्यानंतर या खेळाडूंचे हातपाय शिवशिवत मग मिळेल त्याजागेत त्यांचा सराव सुरु होई. एकच चेंडू आणि दहा–बारा खेळाडू, आम्हीच आयोजक आणि आम्हीच पंच शिवाय सिनिअर.... त्यामुळे आम्ही उगाचच त्याशाळेच्या पोरांवर 'ए इथे खेळू नकारे....' 'ए चला तिकडे बसा...' असे त्यांच्यावर ओरडून उगाचच मोठेपणाचा आव आणत असू. अशावेळी आप–आपल्या शाळेच्या संघाची शिस्त सांभाळणारे क्रीडा शिक्षक प्रसंगी दोन तडाखे टाकून, ओरडून संघाला शांत बसवत, सामने सुरु झाले की हे शिक्षक इतक्या तन्मयतेने कोचिंग करत की बऱ्याचवेळा आम्ही खेळ पाहण्यापेक्षा त्यांच्या आक्रमक पावित्र्यात आलेल्या कोचिंग स्टाईल न्याहाळत बसायचो. सामना संपला की क्रीडा शिक्षकांची खेळाडूंना घरी पाठवायची लगबग, काळजी, तत्परता हे सर्व बघत बसायचो. दिवसाच्या शेवटी यातील बऱ्याच जणांबरोबर चहा प्यायला बसायचो. क्रीडाशिक्षकांच्या ओरडून ओरडून बसलेल्या घशात चहा जाताना मलाच घसा शेकल्याचे समाधान मिळाल्यासारखे वाटे. या क्रीडा स्पर्धां दरम्यान बरेच क्रीडा शिक्षक मित्र झाले ते कायमचेच. हा लेख लिहिताना पुन्हा यातील काही मित्रांशी त्यानिमित्ताने गप्पा झाल्या.

या सर्व क्रीडा शिक्षकांची संघ उभा करण्याची इच्छाशक्ती व संघर्ष पहिला की स्तिमीत व्हायला होते याचे मुख्य कारण म्हणजे कोणतेही अधिक मानधन न मिळता उलट आपल्याच खिशाला चाप बसूनही अनेक वर्ष खेळाडू घडविण्याचे यांचे काम अव्याहतपणे चालूच आहे. हा त्यांचा ध्यास, धडपड, कष्ट म्हणजे मोठे समाजकार्यच म्हणावे लागेल. अगदी दोन–चार विद्यार्थ्यांवर सुरु केलेला व्हॉलीबॉल अल्पावधीतच शाळेत सर्वात जास्त विद्यार्थीप्रिय खेळ म्हणून लौकिकास आणणारे क्रीडाशिक्षक म्हणजे या खेळाच्या प्रसाराचे दीपस्तंभच म्हणावे लागतील. त्यांच्या शाळांनी त्यांच्या या कार्याला सहकार्य करो वा ना करो, ते दीपस्तंभासारखे मैदानावर उभेच असतात..... स्थिर... भक्कम... अविचल!

व्हॉलीबॉल खेळायला तसा जरा अवघडच, हवेत गतिमान असणाऱ्या चेंडूला आपल्या हातांच्या साहाय्याने न थांबवता अचूक दिशा देणे. हें मूलभूत कौशल्यच कठीण असते. त्यामुळे खेळायला आलेल्या मुलामुलींचा उत्साह त्यांच्याशी सतत सवांद साधून टिकवावा लागतो, त्यांच्याशी

'बॉण्डिंग' प्रस्थापित करावे लागते हें सर्वच क्रीडा शिक्षकांच्या अनुभवातून पुढे आले. एकदा व्हॉलीबॉलचे वेड लागले की मग त्यांना मोठी स्वप्ने मोठी ध्येये दाखवून त्यासाठी घाम गाळण्याची तयारी सुरुवात होते, मोठे ध्येय त्यांना दाखवले की मग स्वयंप्रेरणेनेच, उत्साहाने संचारले, यशासाठी भुकेलेले हे खेळाडू लढवय्ये मैदानात आपले तनमन स्वाहा : करून टाकतात, आता हा होम पावसानेहि विझत नाही. कितीही पाऊस चालू असला तरी त्यांना मात्र येऊ घातलेल्या आंतरशालेय स्पर्धा खुणवत असतात. या स्पर्धांमध्ये विजयी होण्याचे, चमकण्याचे स्वप्नच या शालेय खेळाडूंना मेहनती–साठी मानसिक खाद्य पुरवत असते.

स्पर्धांमध्ये आपल्या मुलांनी चमकावे, चांगल्या पातळीवर खेळावे, वर्तमानपत्रात नाव यावे, मेडल मिळावे हीच छोटीशी अपेक्षा ठेवून खेळाडूंचे पालकहि आपल्या मुलाच्या या मेहनतीकडे पाहत अभिमानाने मग्न होतात, त्याचा आनंद घेतात. सुरवातीला मात्र याच पालकांना खेळाचे महत्व, सुदृढतेचे महत्व पटवून देण्याचे काम क्रीडाशिक्षकांनाच करावे लागते. विशेषतः मुलींच्या पालकांना विश्वास देऊन या खेळाडू मुलींना क्रीडाशिक्षक पोटच्या मुलींप्रमाणेच सांभाळतात

दहावीला गेल्यावर मात्र हे पालक मुलांच्या अभ्यासाबाबत इतके गंभीर होतात की मुलाचे मैदानावर जाणे हळूहळू बंदच करतात, आणि हाच तो 'टर्निंगपॉईंट', खेळाडू मैदानापासून दुरावतात ...., लय तुटते ..., स्वप्ने बदलतात... ध्येय भटकतात. यातील बरेच खेळाडू पुन्हा मैदानावर येतच नाही. इतकी वर्ष उन्हातान्हात राबून क्रीडाशिक्षकाने घडविलेले खूपच कमी खेळाडू पुन्हा मैदानावर दिसतात. क्रीडाशिक्षकाच्या आणि व्हॉलीबॉलच्या विश्वात तरंगणारे असे बरेच तारे, शिक्षकाच्या परिघातून जे सुटतात ते पुन्हा या व्हॉलीबॉल मंडलामध्ये फारसे दिसत नाही. क्रीडाशिक्षकांशी याबाबत चर्चाकेल्यानंतर असे लक्षात आले की दहावी नंतर या खेळाडूंना सतत खेळात ठेवण्याची जबाबदारी ही संघटनेने व विविध क्लबने घेतली पाहिजे. खुल्या गटासाठी सामन्याचे आयोजन होते परंतु या एकोणवीस वयोगटांसाठी ना सामने होतात ना त्यांच्यावर कोणी पूर्वीप्रमाणे नियंत्रण ठेवून त्यांचा सराव घेतात त्यामुळेच आंतरशालेय स्पर्धांना दिसणारी व्हॉली–बॉलची गर्दी खुल्यागटांपर्यंत येईस्तोवर पारच कमी झालेली दिसते. हे मान्य आहे की विद्यार्थ्यांना त्यांच्या करियरची वेध लागतात तरीपण दिवसातून किमान दोन तास व्हॉलीबॉल मैदानावर खेळण्यासाठी आकृष्ट करण्याची जबाबदारी आपण सांभाळली पाहिजे तरच शालेय गट ते खुला गट यांमधला हा पूल व्हॉलीबॉलला भक्कम पाया देईल.

स्पर्धांचा विषय निघालाच आहे तर हे ही खरे की तुलनात्मक दृष्ट्या क्रिकेट, फुटबॉल, बास्केटबॉल याखेळांपेक्षा आपल्या व्हॉलीबॉल स्पर्धा कमी होतात. खेळाडूंना जर त्यांची कौशल्य, जिगर दाखवायची संधीच मिळाली नाही तर मग नुसता सराव निरस वाटू लागतो. खरंतर स्पर्धांमुळेच खेळाडूंना आव्हाने मिळतात, चुरस निर्माण होते आणि त्यामुळे खेळाचा स्तर वाढतो. स्पर्धांच्या संख्येबरोबरच त्याच्या आयोजनाचा दर्जाही महत्वाचा त्याकडे या खेळाडू, पालक, पत्रकार यांचे लक्ष असते.

याठिकाणी आवर्जुन एक मुद्दा नमूद करावासा वाटतो की खुल्या गटातील खेळाडू हे त्याखेळाचा चेहरा असतात. तरुण वयात खेळताना सामन्यांमध्ये आपल्या भावनांवर नियंत्रण हवे. राग, आक्रमकता व्यक्त होताना माझ्याकडूनही या चुका अनेकवेळा घडल्या. आपल्या व्हॉलीबॉलचे वातावरण थोडे शिवराळ असते. त्यामुळे काही खेळाडू, पालक

खेळापासून अलिप्त होत जातात. आपला व्हॉलीबॉल सर्वांना हवाहवासा वाटला पाहिजे. सर्वस्तरातील खेळाडू, पालक, प्रेक्षक आणि हो... पंचानाही, खेळाच्या आवेगामध्ये काहीवेळा पंचांचा योग्य मान राखला जात नाही हे आपण बदलायला हवे.

आता व्हॉलीबॉलचा चेहरा बदलत चालला आहे. आपल्या खेळातही थोडेफार अर्थकारण मूळ धरू लागले आहे. वरिष्ठ क्रीडाशिक्षकांची खेळ, खेळाडू, त्यांचे यश, त्यांचे आदरयुक्त प्रेम हीच खरी संपत्ती. बदलत्या काळात काही बदल होतीलही पण एक मात्र खरं आत्मिक समाधानासाठी म्हणा किंवा आर्थिक समाधानासाठी म्हणा खेळाडू घडविणे, संघ उभा करणे हे क्रीडा शिक्षकाला मनापासून वाटलेच पाहिजे, मैदानावर विद्यार्थाना आणून त्यांना खेळाचे बाळकडू पाजलेच पाहिजे.

क्रीडा शिक्षक संपूर्ण शाळेच्या शारीरिक शिक्षणाचा मोठा डोलारा सांभाळूनही व्हॉलबॉलचे संघ उभे करतात. मला असे वाटते की या शालेय खेळाडूंना विविधक्लब, माजीखेळाडू, संघटना या सर्वानी खेळाडूंचा व खेळाचा स्तर वाढावा म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजे. अनेक माजी खेळाडू ज्यांना खेळामुळे ओळख मिळाली, नोकऱ्या मिळाल्या तेही खेळाकडे पाठ फिरवतात. ज्या खेळाने आपल्याला पद, प्रतिष्ठा, पैसा किमान आनंदतरी मिळवून दिला त्या खेळाचे आपण काही देणे लागतो हि भावना मनात का निर्माण होत नाही? ज्या मैदानावर आपण घाम गाळला त्या घामाचे मोती झाले! त्या मैदानावर पुन्हा प्रेक्षक म्हणूनही आपण फिरकूनये? ही मैदाने आपल्याला साद घालतायेत, नवीन खेळाडू आपल्याला काहीतरी मागतायेत, आपला खेळ आपल्याला दिलेल्या आनंदाच्या मोबदल्यात आपल्याकडून थोडासा वेळ मागतोय. हा थोडासा वेळ जर सर्वानी कोणत्या ना कोणत्या भूमिकेतून दिला तर नक्कीच व्हॉलीबॉलची या मैदाने तुडुंब भरणार, स्पर्धानां भरपूर गर्दी होणार आणि आपला महाराष्ट्र, देशाला अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडू देणार हे नक्कीच !!!

क्रीडाशिक्षक शाळेच्या शारीरिक शिक्षणाचा मोठा डोलारा सांभाळूनही हॉलीबॉलचे संघ उभे करतात. मला असे वाटते की, या शालेय खेळाडूंना विविध क्लब, माजी खेळाडू, संघटना या सर्वांनी खेळाडूंचा व खेळाचा स्तर वाढावा म्हणून जाणीव–पूर्वक प्रयत्न केले पाहिजे. १९९० च्या दशकात प्रत्येक संघात १ किंवा २ चांगले अटॅकर दिसायचे. पण, आता संघामध्ये तीन ते चार चांगले अटॅकर्स असतात, सेटर ही चांगले असतात. कारण, क्रीडाशिक्षक हे त्यांचा कसून सराव घेतात. या सर्व खेळाडूंच्या आक्रमणातील समन्वय समन्वय, सेंटर ब्लॉकिंग, क्विक अटॅक, कॉम्प्लेक्स I, कॉम्प्लेक्स II इत्यादी संघाचे डावपेचांचा सराव भरपूर व्हायला हवा. खेळाडूंची वैयक्तिक कौशल्यही उच्च दर्जाची व्हायला हवेत. खेळाडूंच्या उच्च कार्यमानासाठी स्फोटक ताकद, चपळता, आणि हिटिंग पॉवर वाढवणे गरजेचे आहे. हे सर्व एकट्या क्रीडा शिक्षकाला त्याच्या व्यग्र वेळापत्रकातून शक्य होईलच असे नाही. माजी खेळाडूंनी या शालेय खेळाडूंना दहावी अगोदर किंवा एखाद्या क्लबवर याचा सराव द्यायला हवा. दहावीनंतर तर या खेळाडूंना नक्कीच आपली गरज आहे.

या लेखाचे खरे श्रेय हे माझ्यासारख्या लेख लिहणाऱ्याला नसून अनेकवर्ष ऊन वारा पावसात अखंड काम करणारे, अनेक क्रीडा शिक्षक जसे माझे मित्र श्री. विलास घोगरे, श्री. रमेश बामणे, श्री. संजय मोतलिंग, श्री. शिवाजी जाधव, श्री. किरण पवार, श्री. यादव सर अश्या अनेक परिचित अपरिचित क्रीडा शिक्षकांना जाते.

**श्री. गणेश गावडे**
राष्ट्रीय व्हॉलीबॉल खेळाडू, प्रशिक्षक
ईमेल : ganeshavn30@gmail.com